(५०५)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/यशवंतनगर/ २५८ /२०१९.
दिनांक : २५/ २ /२०१९.

# झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/ झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विकसक मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना सदर योजनेची पात्रता यादी (परिशिष्ट-२) करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत. त्याप्रमाणे सदर झोपडपट्टीमधील ७०% पेक्षा जास्त झोपडीधारकांनी पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली असून त्यांची पात्रता निश्चित करणेची कार्यवाही या कार्यालयामार्फत करावयाची आहे.

आणि ज्याअर्थी अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व एकूण क्षेत्रापैकी १३०५.७० चौ.मी. एवढे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३१/०१/१९९१ भाग १ पुरवणी पा.नं.२५० कलम ४(१) अन्वये घोषित असून उर्वरित क्षेत्राकरीता झो.नि.पु.स्थापत्य विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचा झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल दि.२१/१२/२०१८ रोजी या कार्यालयास प्राप्त असलेमुळे सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

**आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रसिध्द झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आंत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील" असे नमूद केले आहे.**

आणि ज्याअर्थी, दि.०५/०१/२०१९ ची नोटीस स्थानिक वर्तमानपत्रात तसेच महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्दीकरीता देणेत येऊन खालील अनुसुचिमध्ये निर्दिष्ठ क्षेत्राचे जमीन

मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवासांचे आत लेखी स्वरूपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३ यांचेकडे सादर करण्यास फर्मविण्यात आलेले आहे. तसेच सदर जाहीर नाटीशीची प्रत मा.आयुक्त, (भूमि जिंदगी विभाग), पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना या कार्यालयाकडील पत्र क्र.झोपुप्रा/सप्रा३/यशवंतनगर/३९/२०१९ दि.०७/०१/२०१९ अन्वये देण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नोटीशीस अनुसरून पुनवर्सन योजना करणेत येणारी उपरोक्त मिळकत स.नं.११०, सि.स.नं.६३६७ क्षेत्रफळ ४४००.०० चौ.मी. ही पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या मालकीची असून पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांची सदर जाहीर नोटीशीस कोणत्याही प्रकारची हरकत प्राप्त झालेली नाही. परंतु सदर मिळकतीलगत असलेल्या १५ सोसायटी यांची आक्षेप /हरकत प्राप्त झालेली असता ३(क) पूर्वसूचना नोटीशीमधील तरतुदीनुसार संबंधित हरकतदारांनी उपरोक्त मिळकतीवरती स्वत:चे मालकी हक्क/हितसंबंध प्राप्त असलेबाबत कोणतेही कागदोपत्री पुरावे सुनावणीवेळी दाखल केलेले नाहीत. त्यामुळे संबंधितांचे आक्षेप/हरकत अमान्य करणेत येऊन त्याबाबतचे स्वतंत्र आदेश पारित करणेत आलेले आहेत.

त्याअर्थी, मी, सुरेश दत्तात्रय जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचित नमूद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून चार आठवडयांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत कान्हेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा(पुर्व), मुंबई-४०००५१ यांचेकील अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपीलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| १) स.नं.९९ पैकी, सि.स.नं.६६३३, यशवंतनगर, पिंपरी, पुणे (सध्याचे झोपडपट्टीचे क्षेत्र) (बांधकाम अयोग्य) | ३६७४.५ चौ.मी. (दाखल प्रस्तावानुसार) | **पुर्वेस** - सि.स.नं.६६५३ पैकी<br>**पश्चिमेस** - सि.स.नं.६६३२<br>**उत्तरेस** - सि.स.नं.६६३४ ते ६६४१, ९.० मी. डी.पी.रोड.<br>**दक्षिणेस** - स.नं.१०० पैकी |
| २) स.नं.११०, सि.स.नं.६३६७ (पुनर्वसन योजना प्रस्तावित असलेले क्षेत्र.) | ४४००.०० चौ.मी (पुनर्वसन योजना प्रस्तावित असलेले क्षेत्र.) | **पुर्वेस** - सि.स.नं.६३६७ पैकी<br>**पश्चिमेस** - लागू रस्ता<br>**उत्तरेस** - लागू सि.स.नं.६३६८<br>**दक्षिणेस** - सि.स.नं.६३६७ पै, लागू रस्ता |

सदरचा आदेश माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना पुणे

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक -